पुढारी पु-पा-१.

# अप्पर तहसीलदार कार्यालयात फिफो प्रणाली सुरू करा

## मनसेची मागणी; १५ दिवसांचे अल्टिमेटम अन्यथा आंदोलन

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर अप्पर तहसीलदार कार्यालयाने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार अंमलात आणलेली फिफो (फर्स्ट इन फर्स्ट आऊट) प्रणाली काही दिवसांपूर्वी परस्पर बंद केली. यामुळे नागरीकांचा तोटा तर दलालांचा फायदा होऊ लागला आहे. यामुळे बंद केलेली फिफो प्रणाली तात्काळ सुरु करण्यात यावी, अशी मागणी मिरा-भाईंदर मनसे सचिव श्रेयस सावंत यांनी विभागीय आयुक्तांसह जिल्हाधिकारी व भाईंदर येथील अप्पर तहसीलदारांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. त्यासाठी १५ दिवसांचे अल्टिमेटम देण्यात आले असून यानंतरही ती प्रणाली सुरु न केल्यास मनसे स्टाईलने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला

या प्रणालीमुळे महसूल विभागाकडून देण्यात येणारे जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला, डोमिसाईल प्रमाणपत्र, रहिवासी नागरीक प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र आदी प्रमाणपत्रे व दाखले कमी वेळात मिळावेत आणि पालकांची गरज लक्षात घेऊन त्यांची दलालांकडून आर्थिक पिळवणूक होऊ नये, त्यावर कायमस्वरूपी प्रतिबंध बसावा, यासाठी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महसूल विभागासंबंधी नागरीकांची कामे तात्काळ होण्यासाठी फिफो प्रणाली राज्यभर लागू करण्याचा आदेश दिला. यानुसार राज्याच्या महा-आयटी विभागामार्फत फिफो प्रणाली राज्यात सर्वत्र कार्यान्वित करण्यात आली. या प्रणालीद्वारे नागरीकांना विविध दाखले शैक्षणिक कार्यासाठी तसेच नोकऱ्यांसाठी दिले जातात. तहसीलदार व प्रांताधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्क्याने हे दाखले वितरीत करण्यात येतात. या प्रणालीच्या माध्यमातून प्रथम अर्ज करण्यात आलेल्या व्यक्तीचे काम आधी करण्यात येते.

### अप्पर तहसीलदार कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

तसेच याबाबत सावंत यांनी विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर व जिल्हाधिकारी आशिक शिनगारे यांच्याकडे देखील पत्रव्यवहार केला. मात्र त्याचे उत्तर सावंत यांना देण्यात आले नाही. हि प्रणाली बंद केल्याने अत्यंत महत्त्वाची ठरलेली सेवा बंद झाल्याचे सावंत यांच्याकडून सांगण्यात आले. परिणामी भाईंदर येथील अप्पर तहसीलदार कार्यालयात दलालांचा सुळसुळाट सुरू झाला असुन त्यांना काही शासकीय अधिकाऱ्यांमुळे अच्छे दिन आले आहेत. अगोदरच राज्यात भ्रष्टाचारामध्ये अव्वल स्थान पटकाविणाऱ्या महसूल विभागात आणखी भ्रष्टाचार बोकाळल्याचा आरोप सावंत यांनी केला आहे.

लोकमत पु-पा-३.



वसई फाटा येथील ओव्हर ब्रिजच्या खाली एक पिस्तूल, जिवंत काडतुसासह एका आरोपीला पेल्हार पोलिसांनी रविवारी सायंकाळी अटक केली.

# पिस्तूल, जिवंत काडतुसासह एका आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई फाटा येथील ओव्हर ब्रिजच्या खाली एक पिस्तूल आणि एका जिवंत काडतुसासह एका आरोपीला पेल्हार पोलिसांनी रविवारी सायंकाळी अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून ४५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून केला आहे, तर हा आरोपी ही शस्त्रे कोणाला विकण्यासाठी आला होता याचा तपास करत आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वसई फाट्याच्या ओव्हर ब्रीजखाली एक आरोपी पिस्तूल आणि एका जिवंत काडतुसासह विक्रीसाठी येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना मिळाली होती.

## मुद्देमाल हस्तगत

- या माहितीच्या आधारे त्यांनी पोलिस अधिकारी आणि अंमलदारांना कारवाईचे आदेश दिले. यानंतर पेल्हार पोलिसांनी सापळा लावला होता. रविवारी संध्याकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास एक संशयास्पद तरुण दिसल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतल्यावर त्याच्याकडे एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस सापडले.
- पोलिस अंमलदार दिलदार शेख यांनी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला. पोलिसांनी पिस्तूल, एक जिवंत काडतूस, एक मोबाइल असा एकूण ४५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# विजयवल्लभप्रकरणी अधिकाऱ्यांची चौकशी करा

## प्रहार संघटनेची मुख्यमंत्री शिंदेंकडे मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सन २०२१ साली विरारच्या विजयवल्लभ रुग्णालयाला आग लागून घडलेल्या दुर्घटनेत १५ निष्पाप जीवांच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी पालघरच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून शासनास सादर केलेला अहवाल नुकताच हाती आला आहे. या चौकशी अहवालामध्ये धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे मनपाच्या वरिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांची एसआयटी यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची प्रहारने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे मागणी केली आहे.

२३ एप्रिल २०२१ रोजी पहाटे मनपा हद्दीतील विजयवल्लभ रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात आग लागून घडलेल्या दुर्घटनेत १५ निष्पाप जीवांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

## अहवालानंतर कारवाई का करत नाही?

- या घटनेसंदर्भात चौकशी करण्यासाठी पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली होती. ही दुर्घटना घडल्यानंतर एक महिन्यांच्या कालावधीत त्यांनी चौकशी अहवाल राज्य शासनास सादर केला होता.
- विशेष बाब म्हणजे हा चौकशी अहवाल शासनास सादर करून जवळपास तीन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी उलटून गेला आहे, मात्र या चौकशी अहवालावर राज्य शासनाने आजवर कारवाई का केली नाही? हा चौकशी अहवाल जनतेपासून का दडवून ठेवला गेला, असा प्रश्न प्रहार जनशक्ती पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष तथा ठाणे संपर्कप्रमुख हितेश जाधव यांनी केला आहे.

CamScanner

लोकमत पु-पा-१.

# 'हर घर जल' आहे कुठे?

## वसईत ३१ ग्रामपंचायतींवर श्रमजीवीचा हंडा मोर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** देशभरातील नागरिकांना मुबलक पिण्याचे पाणी देणारी पंतप्रधानांची महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. योजनेच्या टेंडर प्रोसेस, अंदाजपत्रकाप्रमाणे काम न करणे, पाईप खरेदीत अपहार अशा अनेक बाबी श्रमजीवीने उघड करत वसई तालुक्यात ३१ ग्रामपंचायतींवर हंडा मोर्चा काढला.

गावांत जलजीवन मिशनअंतर्गत हर घर जल देण्याचा कार्यक्रम सुरू आहे. ४ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक गावातील सर्व कुटुंबांतील घरांत नळाने पाणीपुरवठा मिळालेच पाहिजे, अशी योजना आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने कोट्यवधी रुपयांची तरतूद केली आहे. १५व्या वित्त आयोग व पेसामधून हा पाणीपुरवठ्यासाठी खर्च होणार आहे. या योजनेसाठी निधीची कमतरता नसताना योजना पूर्ण करण्याची मुदत संपली आहे. अजूनही अनेक गावांमध्ये सर्व घरांना, झोपड्यांना गावात नळाने पाणीपुरवठा झालेला नाही.



श्रमजीवीने वसई तालुक्यात ग्रामपंचायतींवर हंडा मोर्चा काढला.

### ३१ मार्चपूर्वी करायची होती सर्व कामे पूर्ण

**१** या योजनेत ग्रामसेवक व पाणीपुरवठा, आरोग्य व स्वच्छता समिती यांनी प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करायची आहे. ती अजूनही झालेली दिसत नाही. शासन निर्णयाप्रमाणे दि. ३१ मार्च २०२४ पूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याची होती. परंतु अजूनही गावातील प्रत्येक कुटुंबातील घरांना नळ जोडणी झालेली नाही.

**२** या जलजीवन मिशन योजनेतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील कामे अजूनही अर्धवट आहेत. त्यामुळेच गावातील प्रत्येकाच्या घरापर्यंत नळ पोहोचलेला नाही. या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे व कामी निकृष्ट दर्जाची झाल्याचे संघटनेने केलेल्या पाहणीत सत्य समोर आले आहे.

**३** जलजीवन मिशन या योजनेत अजूनपर्यंत तालुक्यातील कोणत्याही गावात पाणी आले नसून अनेक गावांत फक्त पाइपलाइन टाकली असताना पाण्याचे स्रोत अजूनही निश्चित नसल्याने या योजनेत पाणी येणार कुठून? हा प्रश्न आहे.

# भेटायला बोलावून पत्नी, मेव्हण्याने केली मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भेटण्यासाठी बोलावून पत्नी व तिच्या भावाने पतीच्या डोक्यात बांबूने मारहाण केल्याची घटना रविवारी भाईंदरमध्ये घडली.

मालाडच्या कुरार व्हिलेज भागातील सिद्धेश्वर नगर येथे मनोजकुमार सुभाष गुप्ता (३३) हे राहतात. त्यांचे पत्नी संगीता (३१) सोबत मतभेद आहेत. तिचा भाऊ पंकज सियाराम गुप्ता (२९) हा भाईंदर पश्चिमेस न्यू परमानंद इमारतीत राहतो. ३१ मार्च रोजी संगीता हिने पती मनोजकुमार याला भावाच्या घरी बोलावून व बांबूने मारहाण करून जखमी केले. भाईंदर पोलिस ठाण्यात मनोजकुमारने तक्रार दिल्यानुसार पोलिसांनी पंकज व संगीता यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेस ब्लॅकमेल करून बलात्कार करणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका महिलेस ब्लॅकमेल करत धमकावून तिच्यावर बळजबरीने बलात्कार करणाऱ्या आरोपीला भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे.

भाईंदर पश्चिमेस राहणाऱ्या विवाहितेची अंतर्वस्त्रे चोरीने मिळवून, ती तूच मला दिली असे तुझ्या नवऱ्याला सांगेन व बदनामी करेन, असे सातविंदरसिंह मोहिंदरसिंह डफ्फू (४३) याने धमकावले. तिच्या नवऱ्यास अंतर्वस्त्राबद्दल सांगू नये म्हणून तिला ब्लॅकमेल करत तिला स्वतःच्या घरात बोलावून ३ ते ४ वेळा तिच्यावर बळजबरीने शरीरसंबंध केले. होळीच्या दिवशीदेखील तिच्याकडे पाहून अश्लील इशारे केले.

महिलेच्या फिर्यादीनंतर भाईंदर पोलिसांनी ३१ मार्च रोजी गुन्हा दाखल करत डफ्फू याला बेड्या ठोकल्या आहेत. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत

पु-प-१

## दारूच्या नशेत आत्महत्या

नालासोपारा : मर्सेस येथील गायतलाव बेने येथे राहणारे सुभाष जाधव (४२) यांनी दारूच्या नशेत आत्महत्या केली आहे. त्यांना दारूचे व्यसन होते. रविवारी त्यांनी दारूच्या नशेत बेडरूममध्ये छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. वसई पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## महिलेचे मंगळसूत्र चोरले




नालासोपारा : मनवेलपाडा येथील गजगामिनी सोसायटीत राहणाऱ्या वनिता कदम (३७) यांचे पर्समधून मंगळसूत्र चोरीला गेले आहे. वनिता या २२ मार्चला रात्री नालासोपारा ते रत्नागिरीच्या वडगाव येथे एस टी बसने प्रवास करत होत्या. खेड बस स्टॅण्डमध्ये गावाला जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीमध्ये आरोपीने त्यांच्या बॅगमधील १ लाख ५९ हजार ९९४ रुपये किंमतीचे ४०.४१० ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र चोरी केले आहे. नालासोपारा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल करून तपास व चौकशीसाठी खेड पोलिस ठाण्यात वर्ग केला आहे.

पु-प-२



काँग्रेसच्या शिष्टमंडळाने वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्याकडे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यासाठी निवेदन दिले.

## वसई तहसीलसमोर काँग्रेसचे निषेध आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

वसई : केंद्र सरकारने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला कर वसुलीबाबत नोटीस बजावली आहे. केंद्र सरकारकडून सत्ताधारी मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकणे, काँग्रेस पक्षावर कर वसुलीच्या नोटिसा बजावणे अशा प्रकारच्या कारस्थानाविरुद्ध वसई जिल्हा काँग्रेसकडून वसई तहसीलदार कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या. वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्याकडे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यासाठी निवेदन देण्यात आले.

### आर्थिक कोंडी करण्याचे कारस्थान

शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ओनिल अल्मेडा, प्रदेश सरचिटणीस विजय पाटील व पदाधिकाऱ्यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. देशात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना विरोधी पक्षनेत्यांचा आवाज दाबून हुकूमशाही पद्धतीने केंद्र सरकार वागत आहे. निवडणुका मोकळ्या वातावरणात व्हाव्यात, काँग्रेस पक्षाची ऐन निवडणुकीत आर्थिक कोंडी करण्याचे कारस्थान सुरू असून केंद्र सरकारचा हा दहशतवाद आहे. केंद्रीय यंत्रणांचा बेकायदेशीर वापर करून विरोधी पक्षनेत्यांना तुरुंगात टाकले जात आहे, असे या निवेदनात म्हटले आहे.

पु-प-१.

## पत्नी सोडून गेली; पतीची आत्महत्या

नालासोपारा : संख्येश्वरनगर येथील मांगासती कृपा चाळ येथे राहणाऱ्या सुरेंद्र जाधव (३२) यांनी तणावात आत्महत्या केली आहे. त्यांनी पत्नी सोडून गेल्याच्या तणावात रविवारी सकाळी राहत्या घरातील पाइपला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यांना उपचारासाठी मनपा रुग्णालयात नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आचोळे पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## महिलेची आत्महत्या



नालासोपारा : मनवेलपाडा रोडवरील शीतल अंजली बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या रीना सिंग (४५) यांनी नैराश्येतून आत्महत्या केली आहे. त्यांनी रविवारी सकाळी बेडरूममधील पंख्याला ओढणी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे.

CamScanner

लोकमत ५-पा-२.


# महापालिकेच्या हलगर्जीमुळे उत्तन डम्पिंग समस्या गंभीर

## प्रक्रिया होत नसल्याचा आरोप : उभा राहतोय कचऱ्याचा डोंगर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** राज्य शासनाकडून मीरा-भाईंदर महापालिकेला उत्तनच्या धावगी डोंगरावरील तब्बल ३१.४६ हेक्टर इतकी सरकारी जमीन घनकचरा प्रकल्पासाठी फुकट दिलेली आहे. तसे असताना पालिकेने त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊ दिले आहे. अतिक्रमणांवर कारवाई न करता त्याला संरक्षण देताना दुसरीकडे कचऱ्यावर प्रक्रियेऐवजी गेल्या काही वर्षांत येथे मोठ्या प्रमाणात बेकायदा कचरा टाकून कचऱ्याचा डोंगर उभा राहिला आहे.

कचऱ्याच्या लिचेडमुळे खालची शेतजमीन नापीक झाली असून, विहिरींचे पाणी खराब झाले आहे. कचऱ्यावर काटेकोर प्रक्रिया होत नसल्याने परिसरातील उत्तन, पाली, डोंगरी, तरोडी आदी गावांत दुर्गंधी पसरते. या कचऱ्याच्या डोंगरास आग लागणे, हे नेहमीचे झाले आहे. आगीसह मोठ्या प्रमाणात घातक असा विषारी धूर पसरत असल्याने नागरिकांना मोकळा श्वास घेणे अवघड बनले आहे.




### धुरामुळे अनेकांना विविध आजार

धुरामुळे अनेकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, तर साठलेल्या कचऱ्याच्या डोंगरास आग लावली जात असल्याचा आरोप होत आले आहे. महापालिकेने कचरा प्रकल्पासाठी २००७ साली हेंजर बायोटेक हा पहिला ठेकेदार नेमला; परंतु प्रक्रिया होत नसल्याने दुर्गंधीमुळे आंदोलनाचा भडका उडून काही दिवस कचरा टाकणे बंद झाले; पण आंदोलकांवर गुन्हा दाखल झाला. सध्या मे. सौराष्ट्र एन्वायरो प्रोजेक्ट हा ठेकेदार कार्यरत आहे, परंतु गेल्या अनेक वर्षांपासून वर्गीकरण न केलेल्या कचऱ्याचे डोंगर उभे राहिले आहेत.

### भार कमी करण्याची पोकळ आश्वासनेच

या कचऱ्याच्या डोंगरास सातत्याने आग लागत असते. डम्पिंगविरुद्ध हरित लवादपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत काही ग्रामस्थांनी धाव घेतली. पालिकेला फटकारण्यात आले व काही कोटींचा दंड सुनावला गेला; परंतु डम्पिंग ग्राउंडवरील परिस्थिती मात्र फारशी बदललेली नाही. न्यायालयापासून संबंधित यंत्रणा आणि कायदे नियमातील निर्देशांचे आजही काटेकोर पालन महापालिका करत नाही. त्यातच शहरात ठिकठिकाणी लहान कचरा प्रकल्प सुरु करुन उत्तन डम्पिंगचा भार कमी करण्याची पोकळ आश्वासनेच गेली अनेक वर्षे पालिका देत आली आहे.

सकाळ पु.पा.२



वसई : कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी माणिकपूर पोलिस ठाण्याच्या परिसरात प्रात्यक्षिके करण्यात आली.

# सणासुदीसाठी पोलिस दल सज्ज

## वसईत कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रात्यक्षिक

वसई, ता. १ (बातमीदार) : सणासुदीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या माणिकपूर पोलिस ठाण्याच्या परिसरात वरिष्ठ निरीक्षक राजू माने यांच्या नेतृत्वाखाली वसई बस आगारात दंगल नियंत्रण कक्ष, शहरी पोलिसांनी प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

दंगल, मारामारी किंवा अन्य मार्गाने कायदा व सुव्यवस्था बिघडली जात असेल, तर त्यावेळी पोलिसांनी कसा सामना करावा व नियंत्रण मिळवावे, याचे धडे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांकडून देण्यात आले. या वेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी 'तुमचा जमाव कायद्यात नाही. निघून जा', असे फलकदेखील हाती घेतले होते. पुढील काही दिवसांत गुढीपाडवा, रमजान ईद असल्याने पोलिस आयुक्तालयाने शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे आदेश काढले आहे. आयुक्तालय परिसरात एकूण १८ पोलिस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे. पोलिस आयुक्तालय परिसरात हे मनाई आदेश १२ एप्रिलपर्यंत असणार आहेत. मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येणार आहे.

दंगल नियंत्रण कक्ष, अग्निशमन दल, शहरी पोलिस विभागातील कर्मचारी हे अप्रिय घटनांशी सामना करण्यासाठी विविध ठिकाणी प्रात्यक्षिक करताना दिसत आहेत.

लोकसत्ता पु.पा.२.

# बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा

## मिरा-भाईंदर शहरात वाहतूक विभागामार्फत ८६ हजार ४३९ वाहनांवर कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

- **एकूण प्रकरणे** ८६ हजार ४३९
- **एकूण दंडाची रक्कम** ५ कोटी ९४ लाख ९५०
- **एकूण दंड वसूल** ३ कोटी १३ लाख २५०
- **एकूण थकीत दंड** २ कोटी ८१ लाख ७००

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील २०२३-२४ या आर्थिक वर्षात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ८६ हजार ४३९ प्रकरणांची नोंद झाली आहे. अशा वाहनचालकांकडून ५ कोटी ९४ लाख ७६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यातील ९२४ प्रकरणे ही न्यायालयात दाखल झाली आहेत.

मिरा-भाईंदर शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत चालवी म्हणून स्वतंत्र काशिमीरा वाहतूक विभाग स्थापन करण्यात आला आहे. या विभागाकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षाच्या अंती वाहतूक नियमांच्या उल्लंघनाची ८४ हजार ४३९ प्रकरणे नोंदविण्यात आली. त्यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक, विनापरवाना वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे आणि चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे अशा विविध नियमांचा समावेश आहे. यामुळे वाहतूक विभागाच्या तिजोरीत ५ कोटी ९४ लाख ७६ हजार ९५० रुपये दंड जमा झाला आहे. शहरात सध्या जागोजागी खोदकाम केले जात आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवून बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याचे दुहेरी आव्हान येथील वाहतूक कर्मचाऱ्यांवर आहे. हे आव्हान पूर्ण करण्यास सर्व कर्मचाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली असल्याची माहिती काशिमीरा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास हांडोरे यांनी दिली आहे.

CS CamScanner

लोकसत्ता पु.प.९.

# बोगस डॉक्टरच्या चुकीच्या शस्त्रक्रियेमुळे महिलेचा मृत्यू

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** तोतया डॉक्टर हेमंत पाटील याने केलेल्या चुकीच्या शस्त्रक्रियेमुळे वसईतील सामाजिक कार्यकर्त्या माया केनिया (६०) यांचा मृत्यू झाला. या शस्त्रक्रियेमुळे त्यांना अपंगत्व आले होते. तसेच शरीरात अनेक व्याधी निर्माण झाल्या होता. बोगस डॉक्टरने माझ्या पत्नीचा जीव घेतल्याचा आरोप केनिया यांच्या पतीने केला आहे.

मसाला विक्रेता हेमंत पाटील नावाचा तोतया डॉक्टर वसईत अस्थिरोगतज्ञ म्हणून कार्यरत होता. फेब्रुवारी २०२०मध्ये त्याने वसईच्या साईनगर येथील केनिया (६०) यांच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया केली. त्यासाठी अडीच लाख रुपये घेतले होते. चुकीच्या शस्त्रक्रियेने केनिया यांना अपंगत्व आले आणि यांच्या शरीरात विविध व्याधी निर्माण झाल्या होत्या. केनिया चार वर्षांपासून अंथरुणावरच होत्या. शुक्रवारी त्यांच्या प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी त्यांचा मृत्यू झाला. हलगर्जीपणामुळेच केनिया यांचा मृत्यू झाला आहे अशा शब्दात शिवसेनेच्या माजी नगरसेविका किरण चेंदवणकर यांनी संताप व्यक्त केला.

## हेमंत पाटील कोण?

**हेमंत पाटील उर्फ सोनावणे याने बडोदा विद्यापीठाची बनावट एमबीबीएस आणि एमस (सर्जन) म्हणजे अस्थिरोगतज्ञाची पदवी तयार केली होती. त्याच्यावर अमरावती जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात बोगस डॉक्टर प्रकरणात गुन्हा दाखल होता. वसईत अस्थिरोगतज्ञ म्हणून दवाखाना सुरु केला. त्याने केलेल्या शस्त्रक्रियेमुळे ९ जणांना अपंगत्व आले आहे. त्याचे प्रकरण लोकसत्ताने २०२२ मध्ये उघडकीस आणले होते. त्याने वेगवेगळ्या महिलांना फसवून पाच लग्न केल्याचा आरोप आहे. त्याने मिरा-भाईंदर महापालिकेची देखील फसवणूक केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. केनिया यांच्याप्रमाणेच हेमंत पाटील याने ९ जणांवर चुकीच्या शस्त्रक्रिया केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. चुकीची इंजक्शने देऊन, जीवाला धोका निर्माण होईल असे कृत्य केल्याने त्याच्यावर वसई पोलिसांनी ३०७ अन्वये हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक करण्यात आला होती. सध्या तो जामिनावर सुटला आहे.**

लोकसत्ता पु.प.२.

# मिरा रोड येथील व्यावसायिकांकडून चार पिस्तुलांसह ५९ काडतुसे जप्त

## मित्रांना धडा शिकवण्यासाठी कट; दोघांना अटक

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिरा रोड येथून चार गावठी पिस्तुलांसह ५९ काडतुसे जप्त केली आहेत. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

मिरा रोड येथी एका फर्निचर व्यवसायिकाकडे पिस्तूल असल्याची माहिती गुन्हे शाखा १च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार शनिवारी पोलिसांनी छापा टाकला. या वेळी पोलिसांना एक पिस्तूल व सहा काडतुसे आढळली. पोलिसांनी फिरोज चौधरी आणि शाकीर चौधरी यांना अटक केली.




या प्रकरणाचा अधिक तपास केला असता या दोघांनी त्यांचे मित्र असलेले अमान स्टील किचन इक्विपमेंटचे मालक अनिस खान आणि कलीम खान यांना धडा शिकवण्यासाठी कट रचला असल्याचे समोर आले. यावरून दोघा आरोपींची कसून चौकशी केली असता एकूण चार पिस्तूल आणि ५९ काडतुसे पोलिसांना आढळली.

दोन्ही आरोपींनी गुन्हा करण्याच्या उद्देशाने पिस्तूल बाळगल्याने तसेच पोलीस आयुक्त यांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने त्यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून न्यायालयात हजर करण्यात आले.

यापूर्वी देखील आरोपींवर मुंबईसह मिरा रोड पोलीस ठाण्यात सात गुन्हे दाखल असल्याचे उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी सांगितले आहे. गुन्हे शाखा १ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.१.

# तीन वर्षांनी गोपनीय अहवाल उघड


## विजय वल्लभ रुग्णालय आग दुर्घटना प्रकरण; पालिकेचे अनेक अधिकारी दोषी

## मात्र कोणावरही कारवाई नाही, तात्काळ निलंबित करण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** विरारच्या विजय वल्लभ रुग्णालयाला लागेलल्या आगीचा गोपनीय अहवाल ३ वर्षांनी खुला झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केलेल्या या अहवालात रुग्णालय व्यवस्थापनाबरोबर पालिकेच्या अनेक वरीष्ठ अधिकाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले आहे. या अधिकाऱ्यांवर कारवाईचे निर्देश देऊनही कोणावरही कारवाई झालेली नाही. या प्रकरणी प्रहार पक्षाने या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

२३ एप्रिल २०२१ रोजी पहाटे सव्वातीनच्या सुमारास विरारच्या विजय वल्लभ रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील अतिदक्षता विभागाला आग लागली होती. या आगीत १६ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला होता. या आगीसंदर्भात चौकशी करण्यासाठी पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने एक महिन्यातच आपला अहवाल राज्य शासनास सादर केला होता. मात्र हा अहवाल गोपनीय ठेवण्यात आला होता. प्रहार पक्षाने ३ वर्षे पाठपुरावा करून राज्य शासनाकडून अहवाल मिळवला आहे. या आगीच्या घटनेला विजयवल्लभ रुग्णालयाचे व्यवस्थापन जेवढे जबाबदार आहे तेवढेच वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन), अतिरिक्त आयुक्त (वैद्यकीय आरोग्य व विद्युत ), क्षेत्रीय उपायुक्त, उपायुक्त (आरोग्य), उपायुक्त (विद्युत), उपायुक्त (अग्निशमन) त्याचप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव हे सर्व वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा निष्कर्ष या चौकशी अहवालामध्ये काढण्यात आला आहे. दरम्यान, हा अहवाल तयार करणारे पालघरचे तत्कालीन जिल्हाधिकारी माणिकराव गुरसळ यांची बदली झाली आहे. त्यांना यासंदर्भात संपर्क केला असता त्यांनी बदली झाली असल्याने अधिकृत भाष्य करण्यास नकार दिला.



"आम्ही अहवाल राज्य शासनाला सादर केला होता. ज्यांनी आमच्याकडे माहिती अधिकारात अहवालाबाबत माहिती मागितली होती त्यांना आम्ही गोपनिय म्हणून नाकारला होता. -गोविंद बोडके, जिल्हाधिकारी, पालघर.

### 'एसआयटी' चौकशी करा

गंभीर प्रकरणाचा अहवाल गोपनीय सांगून तीन वर्षे दडवून सर्व दोषी अधिकाऱ्यांना संरक्षण दिले. त्यांना तात्काळ निलंबित करून एसआयटी यंत्रणा स्थापना करून चौकशी करावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे पालघर जिल्ह्याध्यक्ष हितेश जाधव यांनी शासनाकडे केली आहे.

### आदेशाकडे दुर्लक्ष

वरिष्ठ अधिकारी हे या घटनेबाबत संवेदनशील नसल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. विभागीय चौकशी सुरु करून त्यांच्या बदल्या कराव्यात असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी अहवालात दिले होते. मात्र त्यावर तीन वर्षे उलटूनही काहीच कारवाई झालेली नाही.

### त्रुटी काय?

- अतिदक्षता विभागातील वातानुकूलित यंत्राची क्षमता १५ टन असणे आवश्यक असताना ती ९ टन इतक्याच क्षमतेची होती. जनित्र संचमांडणी कार्यान्वित करण्यापूर्वी आणि १५ मीटरपेक्षा उंच इमारतीस विद्युतपुरवठा करण्यापूर्वी विद्युत निरीक्षकांची परवानगी घेणे बंधनकारक होते. परंतु सदर रुग्णालयात वरील दोन्ही बाबींची पूर्तता करण्यात आली नव्हती, असे अहवालात म्हटले आहे.
- आगीची घटना घडल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांना गोपनीय अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. वसई-विरार महापालिकेने जो अहवाल पाठवला त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी नव्हती.
- आगीची घटना घडल्यानंतर तत्कालीन अतिरिक्त आयुक्त आशीष पाटील आणि अतिरिक्त आयुक्त संतोष देहरेकर, उपायुक्त किशोर गवस, उपायुक्त शंकर खंदारे आणि उपायुक्त अजिंक्य बगाडे यांनी घटनेची कल्पना जिल्हाधिकाऱ्यांना दिली नाही.
- आगीची घटना घडल्यानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेचे सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी नॉट रिचेबल असल्याचे आढळून आले.
- क्षेत्रीय उपायुक्त नयना ससाणे या घटनेच्या ठिकाणी सकाळी ७ ते ८ तास उशिरा (१०.३० वाजता) हजर झाल्या तर उपायुक्त (आरोग्य) किशोर गवस हे घटना घडल्याच्या सुमारे तीन तासांनतर (सकाळी ६.४०) हजर झाले.
- रुग्णालयाच्या अग्निसुरक्षेबाबत मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव, उपायुक्त (अग्निशमन) आणि अतिरिक्त आयुक्त (अग्निशमन) यांनी कोणतीही जबाबदारी पार पडल्याचे दिसून आले नाही. उपायुक्त (विद्युत) तसेच अतिरिक्त आयुक्त (विद्युत) यांनी विजय वल्लभ रुग्णालयाच्या विद्युत विभागाच्या सुरक्षेबाबत कोणतीही खातरजमा केल्यास दिसून आले नाही.

CamScanner

सकाळ

# सणासुदीसाठी पोलिस दल सज्ज

## वसईत कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रात्यक्षिक



सई : कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी माणिकपूर पोलिस ठाण्याच्या परिसरात त्यक्षिके करण्यात आली.

प्रसाद जोशी

वसई, ता. १ (बातमीदार) : सणासुदीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या माणिकपूर पोलिस ठाण्याच्या परिसरात वरिष्ठ निरीक्षक राजू माने यांच्या नेतृत्वाखाली वसई बस आगारात दंगल नियंत्रण कक्ष, शहरी पोलिसांनी प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

दंगल, मारामारी किंवा अन्य मार्गाने कायदा व सुव्यवस्था बिघडली जात असेल, तर त्यावेळी पोलिसांनी कसा सामना करावा व नियंत्रण मिळवावे, याचे धडे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांकडून देण्यात आले. या वेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी 'तुमचा जमाव कायद्यात नाही. निघून जा', असे फलकदेखील हाती घेतले होते. पुढील काही दिवसांत गुढीपाडवा, रमजान ईद असल्याने पोलिस आयुक्तालयाने शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे आदेश काढले आहे. आयुक्तालय परिसरात एकूण १८ पोलिस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठ खबरदारी घेण्यात येत आहे. पोलिस आयुक्तालय परिसरात हे मनाई आदेश १२ एप्रिलपर्यंत असणार आहेत. मना आदेशाचा भंग करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येणार आहे.

दंगल नियंत्रण कक्ष, अग्निशमन दल, शहरी पोलिस विभागातील कर्मचारी हे अप्रिय घटनांशी सामना करण्यासाठी विविध ठिकाणं प्रात्यक्षिक करताना दिसत आहेत.

Mumbai, Palghar-Today
02/04/2024 Page No. 3

CamScanner

दैनिक
# आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक. ०१ | मंगळवार ०२ एप्रिल २०२४ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# बनावटी बंदुक आणि जिवंत काडतुसांसह एकाला अटक

**वसई.** बेकायदेशीर देशी बनावटीच्या बंदुकांची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला यश आले असून त्याच्याकडून २ देशी बनावटीची शस्त्रे व २ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून ही कारवाई डीसीपी (परिमंडळ) जयंत यांनी केली. बजबळे व एसीपी बजरंग देसाई, पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वंकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमार गौरव धाडवड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सोपान पाटील, गुन्हे अन्वेषण शाखेचे पोपनिरी तुकाराम भोपले यांच्या पथकाने ही कारवाई केली. . पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, ३१ मार्च रोजी पेल्हार पोलीस ठाण्यातील गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी व कर्मचारी गस्त घालत असताना सुमारे १४.३० वाजता गुन्हे



अन्वेषण पथकाचे एपीआय/सोपान पाटील यांना त्यांच्या गुप्त खबरदाराकडून एक व्यक्ती फिरत असल्याची माहिती मिळाली. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर. वसई फाटा क्रमांक ८ येथील पुलाखाली विनापरवाना देशी बनावटीचे बंदुक आणले. बातमीनुसार, एपीआय/सोपान पाटील यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना माहिती दिली. त्यांनी बातमीच्या सत्यतेची पुष्टी केली आणि कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश व सूचना दिल्या.

या आदेशाचे पालन करून पेल्हार पोलीस अधिकारी व कर्मचारी स्टेशनने सापळा रचून अवैध बंदुक बाळगणाऱ्या अभिषेक अनिल यादव (१९) याला ताब्यात घेतले. त्याची दोन वेळा झडती घेतली असता त्याच्याकडून ४० हजार रुपये किमतीची एक देशी बनावटीची बंदुक, १ जिवंत काडतूस, १ फायटर, ५०० रुपयांची एक भारतीय चलनी नोट, ५०० रुपयांची चंद्रन बँक ऑफ इंडिया, ५ हजार रुपयांची एक चलनी नोट सापडली. विवो मोबाईल फोन आणि एकूण ४५,९०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, वरील आरोपींविरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्रास्त्र कायद्याच्या कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१), (३), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद केल्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली. त्याला विश्वासात घेऊन त्याच्या राहत्या घराची झडती घेण्यात आली. त्याच्या फोन गॅलरीत देशी बनावटीचे पिस्तूल आणि काडतुसे यांची अनेक छायाचित्रे सापडली. ४०,००० रुपये किमतीचे आणखी एक देशी बनावटीचे बंदुक व एक जिवंत काडतूस सापडले. त्याच्या घरातून सापडला. मात्र, पोलीस अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत.

CamScanner



ठाणे- मुंबई से प्रकाशित

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# तरुणमित्र

www.tarunmitra.in

संपादक- स्वतंत्र कुमार

श्रम ही आधार, खबरों से सरोकार



वर्ष - 17 ♦ अंक 104 ♦ मंगलवार, 02 अप्रैल 2024 ♦ मूल्य : 2 ♦ पृष्ठ 8 महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार से प्रकाशित e-mail-tarun.thana@gmail.com


### पेल्हार पुलिस की कार्रवाई।

## 2 देशी बनावटी अग्निशस्त्र व 2 जिंदा कारतूस बरामद व एक गिरफ्तार

- **फोन की गैलरी में देशी पिस्तौल एवं कारतूस के कई फोटो मिले**

**तरुणमित्र / संवाददाता**





**वसई।** पेल्हार थाने की अपराध जांच शाखा की टीम ने अवैध देशी अग्निशस्त्र ले जा रहे अभियुक्त को गिरफ्तार कर उसके पास से 2 देशी बनावटी अग्निशस्त्र एवं 2 जिन्दा कारतूस जप्त करने में सफलता प्राप्त की।यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल) जयंत बजबले व एसीपी बजरंग देसाई के मार्गदर्शन में पेल्हार थाने के (वरिष्ठ पुलिस निरीक्षक) जितेंद्र चनकोटी व पुलिस निरीक्षक (अपराध) कुमारगौरव धादवड के नेतृत्व में अपराध जांच शाखा के सहायक पुलिस निरीक्षक सोपान पाटील व पोउपनिरी तुकाराम भोपले की टीम ने की है।पुलिस अधिकारी ने बताया कि,दिनांक 31 मार्च को पेल्हार थाने की अपराध जांच शाखा के अधिकारी- कर्मचारी गश्त करते रहे थे,लगभग 14.30 बजे, अपराध जांच दस्ते के एपीआई/सोपान पाटील को अपने गुप्त मुखबिर से सूचना मिली कि एक व्यक्ति मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय राजमार्ग संख्या 8 पर वसई फाटा में पुल के नीचे एक बिना लाइसेंस वाली देशी अग्निशस्त्र ला रहा है।खबर के मुताबिक, एपीआई/सोपान पाटिल ने पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी को सूचित किया, जिन्होंने खबर की सत्यता की पुष्टि की और कानूनी कार्रवाई करने के निर्देश और निर्देश दिए।उक्त आदेश के अनुपालन में, पेल्हार पुलिस स्टेशन के अधिकारी व कर्मचारी ने जाल बिछाया और अवैध रूप से अवैध अग्निशस्त्र रखने वाले अभिषेक अनिल यादव (19) को हिरासत कर लिया।जब उसकी दो बार तलाशी ली गई तो उसके पास से 40,000 रुपये कीमत का एक देशी अग्निशस्त्र,1 जिंदा कारतूस,1 फाइटर, 500 रुपये का एक भारतीय मुद्रा नोट मिला,500 रुपये का एक चिंद्रान बैंक ऑफ इंडिया का नोट, 5,000 रुपये का एक वीवो मोबाइल फोन,कुलमिलाकर 45,900 रुपये माल जप्त किया गया है।पुलिस अधिकारी ने कहा कि,उपरोक्त अभियुक्त के खिलाफ पेल्हार थाने में भारतीय शस्त्र अधिनियम की धारा 3, 25 के साथ महाराष्ट्र पुलिस अधिनियम की धारा 37 (1), (3), 135 के तहत मामला दर्ज किया गया है।उक्त अपराध पंजीबद्ध कर आरोपी को गिरफ्तार कर उसे विश्वास में लेकर उसके निवास की तलाशी ली गयी, जिसके फोन की गैलरी में देशी पिस्तौल एवं कारतूस के कई फोटो मिले।उसके घर से 40,000 रुपये कीमत का एक और देशी अग्निशस्त्र और एक जिंदा कारतूस मिला।हालाँकि, मामले की जांच पुलिस अधिकारी कर रहे है।

CS CamScanner